दिन विशेष...

१६१० : गॅलिलिओकडून गुरु ग्रहाचा शोध लागला.
१९२१ : चित्रपट अभिनेता चंद्रकांत गोखले यांचा जन्मदिन.
१९२८ : नाटककार, लेखक विजय तेंडुलकर यांचा जन्मदिन.
१९९२ : विश्वनाथ आनंदला ग्रॅन्डमास्टर हा दर्जा प्राप्त झाला.

महाराष्ट्राचे निडर दैनिक

# शौर्य मराठी

RNI-MAHMAR/2023/89125

सेन्सेक्स ८५,४३९.६२ -३२२.३९(०.३८%)
डॉलर ₹ ९०.२३

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | २९ | १३ |
| दिल्ली | १७ | ०९ |
| मुंबई | ३४ | २० |
| नागपूर | २७ | १० |
| पुणे | २९ | १२ |

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | बुधवार, दि. ७ जानेवारी २०२६ | वर्ष २ रे | अंक ५९ | किंमत : ५ रु. | पाने ४


**सुविचार**

वेळेचं महत्त्व ओळखा, कारण वेळ परत येत नाही.

सुर्योदय - सुर्यास्त
स.-७:०६ संध्या-६:०१

**सोने – चांदी**

सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,४०,०१५/- २,४८,०००/-

**केळी भाव**

नवती : ७५१ ते ७७०
पिल बाग : २५१ ते २७०
कांदे बाग : ----

# जळगाव पुढील पाच वर्षांत विकसित शहरांच्या श्रेणीत

## महापालिका निवडणुकीच्या रोड शो प्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा

प्रतिनिधी । जळगाव

**महापालिकेला शासनाकडून काही वर्षांपूर्वी ५० कोटीही मिळत नव्हते. मात्र, आता जळगावात हजारो कोटी रुपयांचे विकास कामे सुरू आहेत. त्यामुळे शहराचा चेहरामोहरा बदलत आहे. जळगावकरांच्या आशीर्वादाने आगामी महापालिका निवडणुकीत पुन्हा एकदा महायुतीची सत्ता येईल आणि महापौरही महायुतीचाच असेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी येथे व्यक्त केला.**



महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मंगळवारी जळगाव शहरात महायुतीच्या प्रचारार्थ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा भव्य रोड शो आयोजित करण्यात आला. त्या आधी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधत जळगाव शहराच्या विकासाचा आराखडा सादर केला. राज्य सरकारच्या निधीतून गेल्या पाच वर्षांत जळगाव शहरात रस्ते, पायाभूत सुविधा आणि विविध विकासकामांसाठी शेकडो कोटी रुपयांची कामे करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, आगामी काळात विकासाच्या दुसऱ्या टप्प्यात उद्याने, पाणीपुरवठा व्यवस्था, अंतर्गत व प्रमुख रस्त्यांचे मजबुतीकरण करण्यात येईल. याशिवाय जळगाव परिसरात उद्योग आणण्यावरही भर देण्यात येणार आहे. जळगावला राज्य सरकारने आधीच विशेष दर्जा दिला आहे. त्यामुळे उद्योगांना पोषक वातावरण निर्माण होईल आणि स्थानिक युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.

विशेष बाब म्हणजे जळगाव महापालिकेवरील संपूर्ण कर्ज राज्य सरकारने यापूर्वीच फेडले. असे कर्ज फेडीचे उदाहरण संपूर्ण राज्यात यापूर्वी कधीही घडले नव्हते. जळगावला पुढील पाच वर्षांत विकसित शहरांच्या श्रेणीत आणण्याचा संकल्प महायुतीने केला आहे. यासाठी लागणारा सर्व निधी राज्य सरकार देईल, अशी घोषणा देखील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकारांशी बोलताना केली.



**दरम्यान, रोड शोमध्ये महायुतीचे जोरदार शक्तीप्रदर्शन पाहायला मिळाले. भाजप, शिवसेना (एकनाथ शिंदे गट), राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) तसेच रिपाइं यांच्या वतीने आयोजित या रोड शोमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह राज्यातील मंत्री, खासदार, आमदार आणि महायुतीच्या घटक पक्षांचे प्रमुख पदाधिकारी खास सजविलेल्या वाहनावर सहभागी झाले होते.रस्त्याच्या दुतर्फा मोठ्या संख्येने नागरिकांनी गर्दी करत मुख्यमंत्री व महायुतीच्या नेत्यांचे जल्लोषात स्वागत केले.**

### ➤ रॅलीत यांचा होता सहभाग

**यावेळी भाजपचे नेते व मंत्री गिरीश महाजन, जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील, वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, खासदार स्मिता वाघ, आमदार सुरेश भोळे, आमदार मंगेश चव्हाण, भाजपचे महानगर जिल्हाध्यक्ष दीपक सूर्यवंशी, शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख विष्णू भंगाळे यांच्यासह महायुतीचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. महायुतीच्या या रोड शोमुळे जळगाव शहरात निवडणुकीचे वातावरण तापले आहे. महापालिका निवडणुकीत विकासाच्या मुद्द्यावर महायुती जोरदार प्रचार करत असल्याचे चित्र दिसून येत आहे.**

## थोडक्यात

### मोहम्मद सिराजचा चेंडू होता की आगीचा गोळा

**राजकोट ।** मोहम्मद सिराजचे भारताच्या वनडे संघात पुरागमन झाले आणि त्याचे पडसाद विजय हझारे ट्रॉफीमध्येही पाहायला मिळाले. मोहम्मद सिराज महत्वाचा सामना खेळण्यासाठी मैदानात उतरला होता. या सामन्यात मोहम्मद सिराजने एक असा चेंडू टाकला की, फलंदाज क्लीन बोल्ड होऊनही त्याला हा चेंडू नेमका कसा आला, हे समजले नाही. ही गोष्ट घडली ती पाचव्या षटकात. मोहम्मद सिराज त्यावेळी भेदक गोलंदाजी करत होता. यापूर्वी तिसऱ्या षटकात त्याने बंगालचा सलामीवीर सुमीत नागला १० धावांवर बाद केले होते. पण तेवढ्यावर मोहम्मद सिराज थांबला नाही. कारण त्यानंतरच्या पाचव्या षटकात त्याने असा एक चेंडू टाकला की, सर्वच जणांना आश्चर्याचा धक्का बसला. या पाचव्या षटकाच्या पाचव्या चेंडूवर ही गोष्ट घडली.

### पुण्यात मिशन १०० ला दादांचे आव्हान

**पुणे ।** येथील महानगरपालिका निवडणुकीत शंभरहून अधिक जागा जिंकण्याचे लक्ष्य ठेवणाऱ्या भारतीय जनता पक्षासमोर आता मित्रपक्ष असलेल्या अजित पवारांच्या राष्ट्रवादीने मोठे आव्हान उभे केले आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी निवडणुकीच्या मैदानात खेळलेली रणनीती आणि शरद पवार गटाशी जुळवून घेतलेली पडद्यामागची समीकरणे यामुळे भाजपच्या गोटात चिंतेचे वातावरण आहे. काही खाजगी आणि शासकीय सर्वेक्षणांमध्ये भाजपला अपेक्षित यश मिळताना दिसत नसल्याने, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यातील बड्या नेत्यांची चांगलीच कानउघाडणी केल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

# ‘व्होट फॉर मालेगाव’च्या घोषणांनी आसमंत दणाणले

### ४ हजार शालेय विद्यार्थ्यांनी साकारली भव्य मानवी साखळी



वृत्तसंस्था । मालेगाव

**येत्या १५ जानेवारी रोजी होणाऱ्या महापालिका निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढावा यासाठी निवडणूक यंत्रणेतर्फे मंगळवारी शहरात विद्यार्थ्यांची भव्य मानवी साखळी काढून मतदारांची जनजागृती करण्यात आली. शहरातील २०० शाळांमधील चार हजारावर विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभाग नोंदवला. महापालिका मुख्यालय ते रावळगाव नाका असे ५ किलोमीटर अंतर या मानवी साखळीने व्यापले होते.**

राज्यातील महापालिका निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी आणि लोकशाही बळकट करण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशाप्रमाणे स्वीप (एसव्हीईईपी) उपक्रमांतर्गत शहरात वेगवेगळे उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्याचाच भाग म्हणून विद्यार्थ्यांच्या मानवी साखळीचे आयोजन करण्यात आले होते. महानगरपालिकेच्या उपायुक्त पल्लवी शिरसाठ यांनी झेंडा दाखवून या साखळीचा शुभारंभ केला. यावेळी महापालिका आणि शिक्षण विभागाचे अधिकारी तसेच विविध शाळांमधील मुख्याध्यापक व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

(पान २ वर)

# जेएनयुमध्ये नरेंद्र मोदी, अमित शहांविरोधात आक्षेपार्ह घोषणाबाजी

### गुन्हा नोंदवण्याची विद्यापीठाची मागणी



वृत्तसंस्था । नवी दिल्ली

**जवाहरलाल नेहरू विद्यापीठ (जेएनयू) कायम कोणत्या न कोणत्या मुद्यांनी चर्चेत असतं. आता या विद्यापीठात सोमवारी रात्री उशिरा एका कार्यक्रमादरम्यान मोठा गोंधळ झाला. यावेळी काही विद्यार्थ्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांच्याविरुद्ध आक्षेपार्ह घोषणाबाजी दिल्याचा प्रकार समोर आला आहे.**

नरेंद्र मोदी, अमित शाह यांच्या विरोधात आक्षेपार्ह घोषणाबाजी दिल्याचा कथित व्हिडीओ व्हायरल झाला आहे. त्यामुळे एकच गोंधळ उडाला आहे. या घटनेबाबत जेएनयू विद्यापीठाने मंगळवारी एफआयआर नोंदवण्याची मागणी केली आहे, तर जेएनयू विद्यार्थी संघटनेने (जेएनयूएसयू) या आक्षेपार्ह घोषणांच्या घटनेवर भाष्य करण्यास नकार दिला आहे. या घटनेची चौकशी अद्याप प्राथमिक टप्प्यात आहे. आतापर्यंत

(पान २ वर)

# काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष हिदायत पटेल यांच्यावर भरदिवसा प्राणघातक हल्ला

वृत्तसंस्था । अकोला

● अकोट तालुक्यातील माहोळ गावात धारदार शस्त्रांनी केले सपासप वार

**जिल्ह्यातील काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष हिदायत पटेल यांच्यावर अकोट तालुक्यातील माहोळ गावात अज्ञात हल्लेखोरांनी धारदार शस्त्रांनी प्राणघातक हल्ला केला. या हल्ल्यात ते गंभीर जखमी झाले असून त्यांची प्रकृती चिंताजनक आहे. पोटात आणि मानेवर खोलवर जखमा झाल्याने त्यांना तातडीने अकोट येथील रुग्णालयात नेण्यात आले, मात्र अधिक रक्तस्राव आणि जखमांचे गांभीर्य लक्षात घेता त्यांना अकोला येथील मोठ्या रुग्णालयात हलवण्यात आले आहे. या हल्ल्यामागे राजकीय वैमनस्याची किनार असण्याची शक्यता वर्तवली जात आहे.**



हिदायत पटेल यांच्यावर आज अकोट तालुक्यातील माहोळ गावात हा हल्ला झाला. काही हल्लेखोरांनी त्यांना घेरले आणि धारदार शस्त्रांनी त्यांच्यावर सपासप वार केले. या हल्ल्यात पटेल यांच्या पोटावर आणि मानेवर खोलवर जखमा झाल्या आहेत. भरदिवसा झालेल्या या हल्ल्यामुळे परिसरात मोठी पळापळ झाली.

रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या पटेल यांना तातडीने अकोट येथील रुग्णालयात नेण्यात आले. मात्र, अतिरक्तस्राव आणि जखमांचे गांभीर्य लक्षात घेता, प्राथमिक उपचार करून त्यांना तातडीने अकोला येथील मोठ्या रुग्णालयात हलवण्यात आले आहे. त्यांची प्रकृती अत्यंत चिंताजनक असल्याचे सांगण्यात येत आहे.हिदायत पटेल यांच्यावर हल्ला झाल्याचे वृत्त वाऱ्यासारखे पसरताच अकोला आणि अकोटमधील काँग्रेस कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने रुग्णालयाबाहेर गर्दी केली. कार्यकर्त्यांमधील संताप पाहता आणि कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून पोलिसांनी अकोला शहरासह माहोळ गावात कडक पोलीस बंदोबस्त तैनात केला आहे.

**आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलिसांची विविध पथके रवाना करण्यात आली आहेत. हा हल्ला कोणी आणि का केला, याचा तपास युद्धपातळीवर सुरू आहे. लवकरच गुन्हेगारांना अटक केली जाईल,’ असे पोलीस प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.राज्यात सध्या महानगरपालिका निवडणुकांचे पडघम वाजत असतानाच हा हल्ला झाल्याने राजकीय वर्तुळात उलटसुलट चर्चांना उधाण आले आहे. नुकत्याच झालेल्या नगरपालिका निवडणुकीत अकोट नगरपालिकेच्या काँग्रेस नगराध्यक्ष उमेदवार अलका बोडके यांनी हिदायत पटेल यांच्यावर पक्षाविरोधी भूमिका घेतल्याचा जाहीर आरोप केला होता. या सर्व पार्श्वभूमीवर, हा हल्ला राजकीय वादातूनच झाला असावा, असा कयास पोलिसांनी वर्तवला आहे.**

# राज्यातील प्रत्येक जिल्हा रुग्णालयांत जनऔषधी केंद्र उभारा

## केंद्रीय आरोग्य मंत्र्यांच्या राज्य सरकारला सूचना

वृत्तसंस्था । मुंबई

**राज्यातील नागरिकांना दर्जेदार व परवडणाऱ्या दरात सहज औषधे उपलब्ध व्हावीत, यासाठी प्रत्येक जिल्हा रुग्णालयात जनऔषधी केंद्र आणि अमृत फार्मसीचे केंद्रे उभारवी, अशा सूचना केंद्रीय आरोग्य मंत्री जे. पी. नड्डा यांनी राज्य सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभागाला दिले. तसेच राज्यातील राष्ट्रीय आरोग्य योजनांची प्रभावी अंमलबजावणी, सार्वजनिक आरोग्य पायाभूत सुविधांचे बळकटीकरण आणि रुग्णकेंद्रित सेवेबाबतही त्यांनी मार्गदर्शन केले.**




महाराष्ट्रातील आरोग्य सेवा अधिक सक्षम व गतिमान करण्यासाठी केंद्रीय आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा व राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांची महत्त्वपूर्ण आढावा बैठक झाली. या बैठकीत राज्यातील राष्ट्रीय आरोग्य योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे, सार्वजनिक आरोग्य पायाभूत सुविधांचे बळकटीकरण करणे आणि रुग्णकेंद्रित सेवा देणे याबाबत सखोल चर्चा करण्यात आली. केंद्र व राज्य सरकारच्या समन्वयातून राज्याच्या आरोग्य क्षेत्रातील उपक्रमांना गती देत लोकाभिमुख, सक्षम आणि विश्वासार्ह आरोग्य

(पान २ वर)

● पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून रुग्णालयामध्ये सुरू करण्यात आलेले जनऔषधी केंद्र आणि अमृत फार्मसी सुरू करण्यात आली आहे. राज्यातील प्रत्येक जिल्हा रुग्णालयामध्ये ही केंद्रे सुरू करण्याच्या सूचना नड्डा यांनी यावेळी केल्या. यामुळे नागरिकांना दर्जेदार व परवडणाऱ्या दरात औषधे सहज उपलब्ध होतील आणि सर्वसामान्य नागरिकांवरील औषधाच्या खर्चाचा ताण कमी होईल, असे त्यांनी सांगितले

# काँग्रेसमुक्त भारतला मूठमाती; भाजपची काँग्रेसशी युती, शिंदेसेनेला बाजूला सारलं

वृत्तसंस्था । ठाणे

**उपमुख्यमंत्री आणि शिवसेनेचे प्रमुख नेते एकनाथ शिंदे यांच्या बालेकिल्ल्यात भाजप, काँग्रेसची युती झाली आहे. या युतीला अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसची साथ लाभली आहे. त्यामुळे शिंदेसेना सर्वाधिक जागा जिंकूनही सत्तेपासून दूर राहणार आहे. या युतीवर शिंदेसेनेनं कडाडून टीका केली आहे. ही अभद्र युती असल्याची टीका शिंदेसेनेकडून करण्यात आली आहे.**

ठाणे जिल्ह्यात येणाऱ्या अंबरनाथ नगरपरिषदेची निवडणूक गेल्या महिन्यात झाली. त्यात शिंदेसेनेनं सर्वाधिक जागा जिंकल्या. तर भाजप दुसऱ्या क्रमांकावर राहिला. नगराध्यक्षपदी भाजपच्या तेजश्री करंजुले विजयी झाल्या आहेत. एकीकडे नगराध्यक्षपद हातून गेलेलं असताना आता अंबरनाथमधील सत्तादेखील शिंदेसेनेच्या हातून जाण्याची दाट शक्यता आहे. भाजपनं काँग्रेसशी हातमिळवणी करत राष्ट्रवादीला सोबत घेत शिंदेसेनेला सत्तेपासून दूर ठेवण्याच्या दृष्टीनं पाऊल टाकलं आहे. त्यामुळे शिंदेसेनेत प्रचंड नाराजी आहे.

काँग्रेसमुक्त भारतची घोषणा खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली होती. पण त्याच काँग्रेसला सोबत घेऊन सत्तेचा सोपान गाठण्याचा

(पान २ वर)

## संपादकीय

### जागतिक व्यापारात नवे डावपेच

डोनाल्ड ट्रम्प यांच्या गेल्या कार्यकाळाचा अनुभव पाहता, अमेरिका बहुपक्षीय मंचावरून बाहेर पडेल किंवा जागतिक प्रशासकीय संस्थांना थेट आव्हान देईल, अशीच शक्यता अधिक वाटत होती. ट्रम्प यांचा कायम असा दावा राहिला आहे की, विद्यमान व्यापार करार हे अमेरिकेच्या विरोधात आणि इतर देशांच्या फायद्याचे आहेत. अशा परिस्थितीत अमेरिकेने २०२४ आणि २०२५ या वर्षांची आपली थकबाकी भरून काढणे आणि सुधारणांचा प्रस्ताव मांडणे, हे या संस्थेला वाचवण्याच्या दिशेने अमेरिकेने टाकलेले पाऊल असल्याचे प्रथमदर्शनी वाटते. मात्र, डब्ल्यूटीओला खिळखिळे करण्याचे धोरण केवळ रिपब्लिकन पक्षाचेच आहे असे नाही, तर जो बायडेन यांच्या प्रशासनानेही संस्थेच्या अपील विभागातील नियुक्त्यांवर सातत्याने नकाराधिकार वापरून ही संस्था निष्प्रभ करण्याचा प्रयत्न केला होता. अमेरिकेने आपल्या प्रस्तवात प्रामुख्याने ज्या मुद्द्यांवर बोट ठेवले आहे, त्यातील काही बाबी जागतिक स्तरावर चर्चेला पात्र आहेत. विशेषतः विकसनशील देश म्हणून स्वतःला घोषित करून त्या आधारे मिळणाऱ्या सवलतींचा विषय अत्यंत कळीचा बनला आहे. चीनसारख्या महासत्ता बनू पाहणाऱ्या देशाने दीर्घकाळ स्वतःला विकसनशील श्रेणीत ठेवून व्यापारात सवलती मिळवल्या, यावर अमेरिकेचा मुख्य आक्षेप आहे. चीनने आता या सवलती सोडण्याची तयारी दर्शवली असली तरी, यामुळे जागतिक व्यापार व्यवस्थेच्या विश्वासार्हतेवर जो परिणाम झाला आहे, तो भरून काढणे कठीण आहे. अमेरिकेचे म्हणणे असे आहे की, यापुढे विशेष सवलती केवळ सर्वात कमी विकसित देशांनाच मिळाव्यात.दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे बेकायदेशीर निर्यात अनुदाने किंवा सबसिडीचा. चिनी अर्थव्यवस्थेत भांडवल, वीज आणि पाणी यांसारख्या घटकांसाठी पडद्यामागून दिली जाणारी अनुदाने ही डब्ल्यूटीओच्या नियमांचे उल्लंघन असल्याचे अमेरिकेचे म्हणणे आहे. चिनी व्यवस्थेतील अपारदर्शकतेमुळे या अनुदानांची नेमकी माहिती जगासमोर येत नाही आणि त्याचा फटका इतर देशांतील उद्योगांना बसतो. अमेरिकेने यावर उपस्थित केलेले प्रश्न रास्त आहेत, कारण जोपर्यंत स्पर्धेचे मैदान सर्वांसाठी समान नसते, तोपर्यंत मुक्त व्यापाराला अर्थ उरत नाही. परंतु, अमेरिका ज्या पद्धतीने या सुधारणा लादू पाहत आहे, ती पद्धत चिंताजनक आहे. लोकशाही मार्गाने व्यापक आघाडी उभी करण्याऐवजी अमेरिका आपल्या अटींवर शासन संरचना बदलू पाहत आहे. त्यातही सर्वात धोकादायक बाब म्हणजे 'मोस्ट फेवर्ड नेशन' अर्थात सर्वात पसंतीचा देश या संकल्पनेवर अमेरिकेने केलेला हल्ला. हा जागतिक व्यापाराचा पाया आहे. द्विपक्षीय वाटाघाटी करून ठराविक देशांना झुकते माप देण्याऐवजी, या तत्त्वामुळे जेव्हा एखादा देश आपले व्यापार नियम बदलतो, तेव्हा त्याचे फायदे सर्व भागीदारांना आपोआप मिळतात. ही व्यवस्था मोडीत निघाल्यास जागतिक व्यापारात अराजकता निर्माण होईल आणि त्याचा सर्वाधिक फायदा मोठ्या अर्थव्यवस्थांना, तर नुकसान गरीब देशांना होईल. भारतासाठी ही परिस्थिती दुहेरी आव्हानाची आहे. भारताने अमेरिकेच्या मनमानी धोरणांना विरोध केला पाहिजे, विशेषतः 'राष्ट्रीय सुरक्षा' या नावाखाली लादल्या जाणार्या सीमाशुल्कांविरुद्ध भारताने भूमिका घेणे आवश्यक आहे. त्याच वेळी, भारताला हे देखील स्वीकारावे लागेल की डब्ल्यूटीओमध्ये वारंवार नकाराधिकाराचा वापर केल्यामुळे जगातील अनेक देश बहुपक्षीय करारांपासून लांब जात आहेत. अमेरिकेच्या काही मागण्या लोकप्रिय ठरण्याची शक्यता असल्याने भारताला आपले धोरण अधिक लवचिक आणि मुत्सद्दी ठेवावे लागेल. शेवटी, जागतिक व्यापार संघटनेचा बचाव करणे हे केवळ नियमांचे पालन करण्यापुरते मर्यादित नसून, ते जागतिक आर्थिक स्थैर्यासाठी अपरिहार्य आहे. अमेरिकेच्या या नव्या पवित्र्याकडे सुधारणेची संधी म्हणून पाहायचे की विखंडनाची सुरुवात, हे येणारा काळच ठरवेल.अमेरिकेच्या आक्षेपांचा सर्वात मोठा फटका भारताला बसू शकतो.

# कृत्रिम बुद्धिमत्ता ही अत्यंत संवेदनशील बाब

## ● सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्रा.डॉ. सदानंद मोरे यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी । जळगाव

**मुद्रणकलेनंतर जर कोणती मोठी क्रांती झाली असेल, तर ती कृत्रिम बुद्धीमत्ता (एआय) तंत्रज्ञानाची आहे. पत्रकारितेत अनेक नवे प्रयोग झाले असले, तरी मानवी मेंदूला टक्कर देण्याची क्षमता असलेली कृत्रिम बुद्धीमत्ता ही अत्यंत संवेदनशील बाब असून, तिचा वापर पत्रकारांनी अधिक सजगता आणि विचारपूर्वक करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्रा.डॉ. सदानंद मोरे यांनी केले.**



मराठी पत्रकार दिनानिमित्त महाराष्ट्रातील दहा विद्यापीठांच्या जनसंवाद व पत्रकारिता विभागांतर्फे मंगळवारी (दि.६) 'कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि माध्यमे' या विषयावर विशेष ऑनलाइन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरुन ते बोलत होते.

यावेळी प्रमुख वक्ते म्हणून ज्येष्ठ पत्रकार डॉ.धनंजय बिजले आणि प्रा.डॉ. योगेश बोराटे यांनी मार्गदर्शन केले. प्रा.डॉ. मोरे यांनी, पत्रकारितेच्या विकासाचे विविध टप्पे स्पष्ट करताना सांगितले की, कृत्रिम बुद्धीमत्तेचा शोध अनेक वर्षांपूर्वी लागला असला, तरी सध्या तिचा वापर सर्वच क्षेत्रांत झपाट्याने वाढत आहे. प्रत्येक तंत्रज्ञानाला जसे सकारात्मक व नकारात्मक पैलू असतात, तसेच एआयचेही आहेत. त्यामुळे पत्रकारांनी एआय-साक्षर होत या तंत्रज्ञानाचा विवेकपूर्ण वापर करणे गरजेचे असल्याचे ते म्हणाले.

### ■ साचेबद्धता वाढण्याचा धोका...

ज्येष्ठ पत्रकार डॉ. धनंजय बिजले यांनी एआयमुळे बातम्यांमध्ये साचेबद्धता वाढण्याचा धोका असल्याचे नमूद केले. वृत्तपत्रांच्या मांडणीसाठी, मुद्रित शोधासाठी तसेच आकर्षक हेडींगसाठी एआयचा वापर होत असला, तरी चुकीची माहिती प्रसारित होण्याचा धोका वाढल्याने फॅक्ट-चेकिंगला अधिक महत्त्व देणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

### ■ एआयचा बहुआयामी वापर कसा करता येईल : प्रा. बोराटे

प्रा.डॉ. योगेश बोराटे यांनी, माध्यमांमध्ये एआयचा बहुआयामी वापर कसा करता येईल, याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. एआयचा उपयोग केवळ मजकूरनिर्मितीपुरता न ठेवता संशोधन पत्रकारितेसाठीही प्रभावीपणे करता येऊ शकतो, असे त्यांनी नमूद केले.

# सीईओ करनवाल यांना 'रोटरी सर्व्हिस लीडरशिप अवॉर्ड' जाहीर

प्रतिनिधी । जळगाव

**रोटरी क्लब ऑफ जळगावच्यावतीने जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांना त्यांच्या प्रभावी नेतृत्वगुण, सेवाभावना आणि समाजोपयोगी कार्याबद्दल प्रतिष्ठित 'रोटरी सर्व्हिस लीडरशिप अवॉर्ड' देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.**



रोटरी क्लब ऑफ जळगावच्या व्यावसायिक महिना उपक्रमांतर्गत हा सन्मान जाहीर करण्यात आला असून, शुक्रवार, दि.९ रोजी सायंकाळी ८ वाजता गणपती नगरातील रोटरी हॉल येथे आयोजित पुरस्कार वितरण समारंभात हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. सीईओ करनवाल यांनी जळगाव जिल्हा परिषदमध्ये कार्यरत असताना प्रशासनात नाविन्यपूर्ण उपक्रम, पारदर्शक कारभार, शैक्षणिक गुणवत्ता, ग्रामीण विकास तसेच लोकाभिमुख प्रशासनाची प्रभावी अंमलबजावणी करत उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांच्या या सामाजिक व प्रशासकीय योगदानाची दखल घेत रोटरी क्लब ऑफ जळगावच्यावतीने हा सन्मान देण्यात येत आहे.

या पुरस्कार समारंभास विविध सामाजिक, शैक्षणिक, प्रशासकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार असून, नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन रोटरी क्लब ऑफ जळगावचे अध्यक्ष गिरीश कुलकर्णी यांनी केले आहे.

# जळगावात ९ जानेवारीपासून बालगंधर्व संगीत महोत्सव

प्रतिनिधी । जळगाव

**बालगंधर्व संगीत महोत्सवाचे आयोजन स्व.वसंतराव चांदोरकर स्मृती प्रतिष्ठानाच्यावतीने ९, १० व ११ रोजी करण्यात आले आहे. छत्रपती संभाजीराजे नाट्य मंदिरात संध्याकाळी ७ ते ११ या वेळेत हा महोत्सव होणार आहे.**

या २४ व्या महोत्सवाचे मुख्य प्रायोजक म्हणून जैन इरिगेशन सिस्टिम्स लि., संस्कृती मंत्रालय भारत सरकार व रतनलाल सी बाफना ज्वेलर्स आहे. तसेच सुहान्स केमिकल्स प्रा.लि., दाल परिवार, वेगा केमिकल्स प्रा.लि. न्युबो टेक्नॉलॉजीस, चांदोरकर टेक्नॉलॉजीस प्रा.लि. यांचेही सहकार्य मिळणार आहे.

या महोत्सवात पहिल्या दिवशी श्रुती बुजरबरुआ (गायन) व चिराग कट्टी (सतार वादन) हे कलावंत सहभागी होणार आहेत. बुजरबरुआ ह्या भारतीय शास्त्रीय संगीताच्या गायिका तसेच पार्श्वगायिका आहेत. त्यांचा जन्म व पालनपोषण आसाममध्ये एका संगीत परिवारात झाला. वयाच्या चौथ्या वर्षापासून त्यांनी आपल्या पालकांकडून मुनींद्र बुजरबरुआह आणि संगीता बुजरबरुआह यांच्याकडून शास्त्रीय संगीताचे धडे घेण्यास सुरुवात केली. त्यांनी भातखंडे संगीत विद्यापीठ, लखनऊ येथून संगीत विशारद व संगीत अलंकार या पदव्या प्राप्त केल्या आहेत.

चिराग कट्टी हे आजच्या काळातील भारतीय शास्त्रीय संगीतातील अत्यंत प्रतिभावान व आशादायी तरुण सतारवादक आहेत. आपले वडील व गुरु पं. शशांक कट्टी यांच्याकडून संगीताचे धडे घेतलेल्या चिराग हे आकाशवाणीचे अ दर्जाचे कलाकार आहेत. २०१७ व २०२४ या दोन्ही वर्षांत त्यांनी आकाशवाणीच्या प्रतिष्ठित नॅशनल प्रोग्रॅममध्ये सादरीकरण केले आहे. ते सुरमणी पुरस्काराचे मानकरी आहेत.

# शिक्षणसेविका रत्नमाला शिंदे यांची नाशिक विभागातून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

प्रतिनिधी । जळगाव

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र (पुणे) यांच्या वतीने राज्यभरातील शिक्षक व अधिकारी यांच्यासाठी विविध ४३ प्रकारच्या शैक्षणिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या अंतर्गत मबालमानसशास्त्र केस स्टडीफ स्पर्धेत जळगाव येथील ए.टी. झांबरे माध्यमिक विद्यालयाच्या शिक्षणसेविका रत्नमाला मोहन शिंदे यांनी मगणितीय संबोध विकासातील अडथळेफ या विषयावर आपली केस स्टडी सादर केली. इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांना गणित विषय शिकताना नेमक्या कोणत्या अडचणी येतात, त्यांचे मानसशास्त्रीय विश्लेषण आणि त्यावरील उपाययोजना, याबाबत त्यांनी परीक्षकांपुढे सविस्तर व प्रभावी सादरीकरण केले.

# समाजाला आरसा दाखविण्याची भूमिका पत्रकारांनी घ्यावी : संदीप घोरपडे

प्रतिनिधी । जळगाव




**समाजाचे अध:पतन होत असून आज पत्रकारांनी समाजाला आरसा दाखविण्याची भूमिका घ्यावी, असे प्रतिपादन संदीप घोरपडे यांनी केले.**

मराठी पत्रकार दिनानिमित्त जळगाव जिल्हा संघातर्फे पत्रकार भवन येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष विजय पाटील हे होते. प्रमुख वक्ते म्हणून जिल्हा माहिती अधिकारी डॉ. रविंद्र ठाकूर व डॉ.सुधीर भटकर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पुजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर दीपप्रज्वलनाने कार्यक्रमांचा शुभारंभ करण्यात आला.

पुढे बोलतांना श्री.घोरपडे म्हणाले की, समाजात गरीब व श्रीमंतांची दरी अधिकाधिक वाढत आहे. वृध्दाश्रमाची संख्या वाढत आहे, ही चिंताजनक बाब आहे. लोकशाहीचे रक्षण करण्याची जबाबदारी ही पत्रकारांची आहे, असेही ते यावेळी म्हणाले. भाषणाचा समारोप करतांना पत्रकार भवनाच्या दुरुस्तीसाठी त्यांनी ५५ हजार ५५५ रुपयांची देणगी घोषित केली.

प्रास्ताविक करतांना विजय पाटील यांनी, पत्रकार संघाची वाटचाल, संघातर्फे पत्रकार व कुटुंबियांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती, ग्रामीण भागातील पत्रकारांना अधिस्वीकृती पत्रिका मिळवून देणे, शासन दरबारी सुरु असलेले प्रयत्न व हीरक महोत्सवी वर्षानिमित्त राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमांची माहिती दिली.

यावेळी डॉ.सुधीर भटकर, जिल्हा माहिती अधिकारी डॉ. रविंद्र ठाकूर यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन देविदास वाणी यांनी केले तर आभार अशोक भाटीया यांनी मानले. कार्यक्रमाला कमलाकर वाणी, अनंत वाणी, प्रमोद पाटील यांनी केले, भागवत पाटील यांच्यासह जिल्हाभरातील पत्रकार उपस्थित होते.

## पान १ वरुन

### राज्यातील प्रत्येक जिल्हा......

व्यवस्था उभारण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला. महाराष्ट्राची सार्वजनिक आरोग्य व्यवस्था अधिक प्रभावी बनविण्याच्या दिशेने ही बैठक महत्त्वाची ठरली. नवी दिल्ली येथे झालेल्या या बैठकीस प्रकाश आबिटकर यांच्यासोबत आरोग्य विभागाचे सचिव रवींद्रन, आरोग्य संचालनालयाचे संचालक डॉ. नितीन अंबाडेकर उपस्थित होते.

### जेएनयुमध्ये नरेंद्र मोदी,......

या प्रकरणात संबंधितांच्या नावांची ओळख पटवली जात असून चौकशी सुरू आहे. विद्यापीठाने त्यांच्या पातळीवर हे घोषणा नेमकं कोण देत होतं? याची चौकशी सुरू केली आहे. तसेच या प्रकरणात संबंधित विद्यार्थ्यांच्या विरुद्ध एफआयआर दाखल करण्यासाठी विद्यापीठाने दिल्ली पोलिसांना पत्र लिहिलं आहे. पोलिसांना लिहिलेल्या पत्रात विद्यापीठाच्या सुरक्षा विभागाने म्हटलं आहे की, '५ जानेवारी रोजी रात्री १० वाजताच्या सुमारास जेएनयूएसयूशी संबंधित काही विद्यार्थ्यांनी ५ जानेवारी २०२० रोजी घडलेल्या एका घटनेला ६ वर्ष झाल्याच्या अनुषंगाने 'क्रूर हल्ल्याची आठवण' म्हणून कार्यक्रम साजरा केला. यावेळी सुमारे ३० ते ३५ विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी काही विद्यार्थ्यांनी अत्यंत आक्षेपार्ह घोषणाबाजी केली. दरम्यान, या घटनेवर विद्यापीठाने असं नमूद केलं की, 'अशा प्रकारच्या घोषणा लोकशाही मतभेदांशी पूर्णपणे विसंगत आहेत. ही घटना जेएनयूच्या आचारसंहितेचं उल्लंघन करते. वरील घटनेत बीएनएसच्या संबंधित कलमांखाली एफआयआर दाखल करण्याचचे निर्देश देण्यात आहेत.

### काँग्रेसमुक्त भारतला......

प्रयत्न भाजपनं सुरु केला आहे. अंबरनाथ नगरपरिषदेत शिंदेसेनेनं सर्वाधिक २३ जागा जिंकल्या आहेत. तर भाजपचे १६, काँग्रेसचे १२ आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे ४ उमेदवार निवडून आले आहेत. भाजपनं काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या मदतीनं बहुमताचा आकडा गाठला आहे. भाजपनं काँग्रेसशी हातमिळवणी केल्यानं शिंदेसेनेत नाराजीचा सूर आहे. ही अभद्र युती असल्याची टीका अंबरनाथचे शिंदेसेनेचे आमदार बालाजी किणीकर यांनी केली आहे. स्वार्थापोटी, सत्तेसाठी भाजपनं काँग्रेस सोबत युती केली. एकीकडे काँग्रेसमुक्त भारतचा नारा द्यायचा आणि दुसरीकडे त्याला अशा प्रकारे छेद देण्याचं काम करायचं, असा टोला किणीकर यांनी लगावला आहे.

### 'व्होट फॉर मालेगाव'......

मानवी साखळीचा मार्ग - महापालिका मुख्यालयापासून सुरुवात झालेली ही साखळी रामसेतू कॉर्नर, गुळ बाजार, सरदार चौक, नंदन टॉवर, किदवाई रोड, संविधान चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पूल, श्री दत्त मंदिर,मोसम पूल, न्यायालय परिसर, राष्ट्रीय एकात्मता चौक, कॉलेज स्टॉप, रावळगाव नाका व चर्च मार्गापर्यंत नेण्यात आली. ड्रोन कॅमेऱ्याद्वारे या विशाल साखळीचे छायाचित्रण करण्यात आले, ज्यामध्ये शिस्तबद्ध रांगेत उभे असलेले विद्यार्थी लोकशाहीचे रक्षक म्हणून भूमिका निभावत असल्याचे प्रतीत होत होते. मानवी साखळीत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी 'मतदार राजा जागा हो, लोकशाहीचा धागा हो!', 'वोट फॉर मालेगावकर', 'माझे मत माझा हक्क', 'माय व्होट,माय फ्यूचर' अशा घोषणा देऊन परिसर दणाणून सोडला होता. मतदारांना संदेश - विद्यार्थ्यांचा उत्साह आणि प्रशासनाचे नियोजन यामुळे या साखळीबद्दल शहरवासीयांमध्ये कुतूहल निर्माण झाले होते. महापालिका निवडणुकीच्या दिवशी घराबाहेर पडून जास्तीत जास्त मतदारांनी मतदानासाठी बाहेर पडावे, हा संदेश या निमित्ताने प्रशासनातर्फे देण्यात आला. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी महापालिका प्रशासनातर्फे चोख नियोजन केले गेले होते. यामध्ये आपत्कालीन व्यवस्थापन, रुग्णवाहिका आणि सुरक्षा रक्षक तैनात करण्यात आले होते.

# प्रौढांची गळफास घेऊन आत्महत्या

प्रतिनिधी । जळगाव

तालुक्यातील कुसुंबा येथे एका ४२ वर्षीय प्रौढाने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना मंगळवार, दि.४ रोजी दुपारी अडीच वाजेच्या सुमारास उघडकीस आली. समाधान भीमराव पाटील (वय-४२, रा. कुसुंबा ता.जळगाव) असे मयत तरुणाचे नाव असून याप्रकरणी एमआयडीसी पोलीस स्टेशनला अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. समाधान पाटील हे आई, वडील, पत्नी, मुलगा, मुलगी यांच्यासह वास्तव्यास होते.

# बेंडाळे महाविद्यालयाच्या रासेयो श्रमसंस्कार शिबिरास सुरुवात

प्रतिनिधी । जळगाव

**येथील डॉ.अण्णासाहेब जी.डी. बेंडाळे महिला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन दि.६ ते १२ जानेवारीदरम्यान दत्तक गाव टाकरखेडा येथे करण्यात आले असून शिबिराचे उद्घाटन मंगळवार, दि.६ रोजी पार पडले.**




लेवा एज्युकेशनल युनियनचे खजिनदार डॉ.किरण बेंडाळे व राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ.व्ही.एम. रोकडे व डॉ.जे.डी. लेकूरवाळे यांच्या उपस्थितीत पार पडले.

याप्रसंगी प्राचार्य डॉ.व्हि.जे. पाटील, उपप्राचार्य डॉ.पी.एन. तायडे, डॉ.हर्षाली पाटील, डॉ.मोनाली खाचणे, डॉ.विनोद नन्नवरे, नुरी तडवी व राजेश कोष्टी आदी उपस्थित होते. 'शाश्वत विकासासाठी युवक पाणलोट व्यवस्थापन आणि पडीत जमीन विकास' या विषयावर हे शिबीर आयोजित करण्यात आले आहे.

यावेळी बोलतांना श्री. बेंडाळे यांनी, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकासासाठी तर डॉ.व्ही. एम. रोकडे यांनी एन.एस.एस. योजनेसंदर्भात मार्गदर्शन केले.

प्राचार्य डॉ.व्ही.जे. पाटील यांनी एन.एसएसचा सिम्बॉल व त्यामधल्या वेगवेगळ्या रंगांच्या संदर्भात संदर्भातील मार्गदर्शन केले. सर्व स्वयंसेवकांनी उत्साहाने उद्घाटन समारंभात भाग घेतला.

# अनामिका प्रतिष्ठानतर्फे १५० विद्यार्थ्यांची नेत्रतपासणी

प्रतिनिधी । जळगाव

**येथील अनामिका प्रतिष्ठानतर्फे खेडी येथील जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांची नेत्र तपासणी व चष्मा वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिरात १५० विद्यार्थ्यांची नेत्र तपासणी करण्यात आली.**



श्री साई नेत्र चिकित्सालयचे नेत्ररोग तज्ञ डॉ. योगेश टेणी यांनी विद्यार्थ्यांची नेत्र तपासणी केली. शिबिरादरम्यान अनेक विद्यार्थ्यांमध्ये दृष्टिदोष आढळून आले. गरजू विद्यार्थ्यांना अनामिका प्रतिष्ठानच्यावतीने मोफत चष्मे वितरीत करण्यात आले. याप्रसंगी मुख्याध्यापक मनोहर बाविस्कर, प्रतिष्ठानचे सचिव प्रमोद माळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनंदा कोळी यांनी केले तर आभार शितल चौधरी यांनी मानले. शिबिराच्या यशस्वितेसाठी ज्ञानेश्वर चौधरी, अरुण चौधरी, तारावंती नन्नवरे, देविदास पाटील, राणी काळे आदींनी परिश्रम घेतले

# रोटरी ग्रीन सिटीच्या अध्यक्षपदी धनश्री ठाकरे, सचिवपदी अॅड.अभय कुलकर्णी

## ● शनिवारी पदग्रहण; प्रांतपाल ज्ञानेश्वर शेवाळेंची उपस्थिती

प्रतिनिधी । जळगाव

**शहरात रोटरी क्लब ऑफ जळगाव ग्रीनसिटी या अकराव्या रोटरी क्लबची स्थापना झाली आहे. त्या क्लबच्या संस्थापक अध्यक्षपदी धनश्री ठाकरे यांची तर संस्थापक मानद सचिव म्हणून अॅड. अभय कुलकर्णी यांची निवड करण्यात आली आहे.**



मायादेवी नगरातील रोटरी भवन येथे शनिवार, दि.१० रोजी सकाळी १०.३० वाजता रोटरी डिस्ट्रिक्ट ३०३० चे प्रांतपाल ज्ञानेश्वर शेवाळे (नाशिक) यांच्या प्रमुख उपस्थितीत नूतन कार्यकारणीचे पदग्रहण होणार आहे. यावेळी सहप्रांतपाल डॉ. अपर्णा भट-कासार यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. या सोहळ्यात क्लबला चार्टर सुपूर्द करण्यात येणार आहे. जगातील क्रमांक दोनची सर्वात मोठी स्वयंसेवी संस्था असलेल्या रोटरीचे जळगाव शहरात गेल्या ७६ वर्षांपासून कार्य सुरू आहे.

विविध क्षेत्रातील व्यक्ती एकत्रित येऊन स्वखर्चाने समाजाच्या विविध गरजू, उपेक्षित घटकांच्या मदतीसह स्वतःच्या व्यक्तिमत्व विकास, परस्पर मैत्री, बंधुभाव यासाठी प्रयत्न करीत असतात.

रोटरी क्लब ऑफ जळगाव रॉयल्सने या अकराव्या क्लबच्या स्थापनेसाठी पुढाकार घेतला आहे.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक सागर काशिनाथ ओतारी व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
✲ कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी (मोबा. - ७५८८१३१३२) (✲ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) E-Mail : dainikshauryamarathi@gmail.com

# धुळेकरांनी चार नगरसेवक बिनविरोध दिले

## ➲ विरोधकांना मिरची लागली तर आम्ही काय करू? : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस







धुळे – महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे धुळे येथे महानगरपालिका निवडणुकीच्या प्रचारार्थ आले असता धुळे हॅलिपॅड येथे मंगळवार रोजी भाजपा धुळे ग्रामीण जिल्हाध्यक्ष बबनराव चौधरी यांनी स्वागत करुन सत्कार केला .

प्रतिनिधी । धुळे

**धुळेकरांनी यावेळी कमाल करून चार नगरसेवक बिनविरोध दिले असून त्यामुळे विरोधकांच्या पोटात मिरची लागली आहे. मात्र याला आम्ही काय करणार? असा खोचक सवाल करीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांवर जोरदार टीका केली. गेल्या वेळी माझ्या आवाहनाला प्रतिसाद देत धुळेकरांनी ५१ नगरसेवक निवडून देत भाजपाला महापालिकेत स्पष्ट बहुमत दिले होते. यावेळी तर चार नगरसेवक बिनविरोध दिले, ही ऐतिहासिक बाब असल्याचे त्यांनी सांगितले.**

धुळे महापालिका निवडणुकीच्या प्रचारार्थ पांझरा नदीकाठी आयोजित भाजपाच्या विजय संकल्प सभेत मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी व्यासपीठावर मंत्री गिरीश महाजन, पालकमंत्री जयकुमार रावल, आमदार अनुप अग्रवाल, आमदार काशिराम पावरा, आमदार राम भदाणे, माजी खासदार डॉ. सुभाष भामरे यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, धुळे हे महाराष्ट्राचे प्रवेशद्वार असून या शहराचा उज्ज्वल इतिहास आहे. २००३ साली स्थापन झालेल्या महापालिकेच्या रौप्य महोत्सवी वर्षात धुळ्याला विकासाच्या नव्या उंचीवर नेण्याचा आमचा संकल्प आहे. अक्कलपाडा योजनेसाठी १७० कोटी रुपये दिल्याने आता दोन दिवसाआड पाणीपुरवठा होत आहे. दररोज घराघरात पाणी पोहोचवणे हे आमचे स्वप्न आहे. विस्तारित ११ गावांसाठी १४३ कोटींची पाणीपुरवठा योजना मंजूर करण्यात आली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली अमृत योजना, घरकुल योजना, भुयारी गटार योजना यासाठी मोठा निधी उपलब्ध झाला आहे. धुळ्यासारख्या शहराला ७१७ कोटी रुपयांच्या योजना मिळाल्या असून काँग्रेसच्या काळात हा निधी मिळत नव्हता, असा आरोपही त्यांनी केला. दरम्यान, आमदार अनुप अग्रवाल यांनी धुळेकरांना आवाहन करताना सांगितले की, भाजपाच धुळे शहराचा खरा विकास करू शकतो. तरुणांना रोजगार मिळावा यासाठी रावेर एमआयडीसी, तापी पाणीपुरवठा योजनेची जुनी पाइपलाईन बदलणे व स्ट्रॉम ड्रेनेज योजनेला मंजुरी देण्याच्या मागण्या त्यांनी मुख्यमंत्र्यांकडे मांडल्या.

शेवटी मुख्यमंत्री फडणवीस यांनी धुळेकरांना पुन्हा एकदा भाजपाला संधी देण्याचे आवाहन करत धुळे शहर स्वच्छ, विकसित आणि उद्योगांचे महानगर म्हणून उभारण्याचे आश्वासन दिले.

### यांनी केला भाजपात प्रवेश

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जाहीर सभेत आज रामालय ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष तथा दोन वेळा नगरसेवक राहिलेले गणेशबापू मोरे, स्व. कुमारशेठ डियालाणी यांचे सुपुत्र तथा सिंधी समाजाचे नेते मणीशेठ डियालाणी व जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष शिवाजीराव दहिते यांचे सुपुत्र सचिन दहिते यांनी भाजपात प्रवेश केला. यावेळी दोंडाईचाच्या नगराध्यक्षा नयनकुंवरताई रावल, शिरपूरचे नगराध्यक्ष चिंतनभाई पटेल, पिंपळनेरच्या नगराध्यक्षा डॉ.योगीता चौरे यांचा सत्कार मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आला.



## थोडक्यात

### नळांना जोडलेल्या १० वीज मोटारी लंपास

**शहादा ।** घरगुती नळांना जोडलेल्या १० वीज मोटर अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना बामखेडा येथे घडली. या घटनेमुळे ग्रामस्थांमध्ये घबराहटीचे वातावरण पसरले असून चोरटयांचा बंदोबस्त करण्यात यावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. गेल्या काही दिवसांपूर्वी मध्यरात्रीच्या सुमारास बामखेडा गावातील सुरेश ब्रिजलाल पटेल, गणेश फकिरा पाटील, रोशन मोहन पटेल, एकनाथ गोरख चौधरी, नारायण बन्शी पटेल, उद्धव रघुनाथ पटेल, रामदास रघुनाथ पटेल, सुरेश लिमजी पटेल, शिवदास पटेल व बुधा कोळी यांच्या घरगुती नळांना जोडलेले वीज पंप अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेले. सकाळी पाणीपुरवठा बंद असल्याचे लक्षात आल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. या प्रकारामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून ग्रामस्थांनी एकत्र येत सारंगखेडा पोलीस ठाण्यात अज्ञातांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, चोरट्यांचा शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करावी अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात आली आहे.

# डॉ.आंबेडकर स्मृती विधी लॉ कॉलेजमध्ये मतदारांसाठी जनजागृती कार्यक्रम



सर्व नागरीक व व्यापाऱ्यांना कळविण्यात येते की, महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ चा कार्यक्रम जाहीर झाला असुन दि.१५ रोजी मतदान व दि.१६ रोजी मतमोजणी निश्चित करण्यात आली आहे. याअनुषंगाने दि.१३ ते १६ या कालावधीकरिता कृषी उत्पन्न बाजार समिती, धुळे बंद राहणार आहे. तरी सर्व नागरीक व व्यापाऱ्यांनी याची नोंद घ्यावी.

प्रतिनिधी । धुळे

येथील महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणुकीत समाजातील सर्व स्तरातील नागरिकांनी मतदानाचा हक्क बजावावा, यासाठी आज डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती विधी लॉ कॉलेज येथे युवकांसाठी विशेष जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. महिला, युवक व दिव्यांग मतदारांनी १०० टक्के मतदान करावे, या उद्देशाने महापालिकेच्या वतीने विविध ठिकाणी मतदान जनजागृती कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. आयुक्त नितीन कापडणीस व अतिरिक्त आयुक्त करुणा डहाळे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम सुरू आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती विधी लॉ कॉलेज येथे आज युवकांसाठी विशेष जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी महापालिकेच्या उपायुक्त स्वालिहा मालगावे यांनी युवकांना मार्गदर्शन करताना सांगितले की, युवा पिढी देशात सकारात्मक बदल घडवून आणू शकते. मतदान हे एक प्रभावी शस्त्र असून त्याच्या माध्यमातून समाज व देशासाठी अपेक्षित बदल घडविता येतो. युवकांनी मतदार यादीत आपली नोंदणी करून मतदान प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा. मतदान केल्याने स्थानिक समस्यांवर आपला आवाज मांडण्याचा अधिकार मिळतो. प्रौढ मतदार मतदानासाठी पुढे येतात, मात्र तरुण मतदार अनेकदा दूर राहतात, ही मानसिकता बदलून युवकांनी देशाचे व समाजाचे भविष्य घडवावे, असे आवाहन करण्यात आले.

या कार्यक्रमास समाज विकास अधिकारी मिना सातभाई, प्राध्यापिका डॉ. जयश्री प्रदीप चव्हाण (साळुंखे) तसेच प्राध्यापक वर्गाचे सहकार्य लाभले.

### सिदाजीआप्पा देवर्षी जयंती नंदनगरीत उत्साहात

प्रतिनिधी । नंदुरबार

वीरशैव लिंगायत गवळी समाजातर्फे बालब्रह्मचारी परम पूज्य सिदाजी आप्पा देवर्षी महाराज यांच्या जयंतीनिमित्त आरती व प्रसाद धार्मिक उपक्रम राबविण्यात आले.

शहरातील गवळी वाडा भागातील नंदेश्वर चौकात परमपूज्य सिदाजीआप्पा देवर्षी यांचे मंदिर आहे.

### धनंजय खंडारे यांचे सुंदर हस्ताक्षर स्पर्धेत यश

प्रतिनिधी । नंदुरबार



तालुक्यातील वाघाळे येथील नवजीवन विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे कलाशिक्षक धनंजय खंडारे यांनी नाशिक विभागीय सुंदर हस्ताक्षर स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावला.

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, नाशिक यांच्यातर्फे नाशिक विभागीय सुंदर हस्ताक्षर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यात नाशिकसह धुळे, नंदुरबार, जळगाव आणि नगर जिल्ह्यातील स्पर्धक सहभागी झाले होते. त्यात वाघाळे येथील नवजीवन विद्यालयातील कलाशिक्षक धनंजय शांताराम खंडारे यांनी १०० पैकी ९१ गुण मिळवित विभागीयस्तरावर तृतीय क्रमांक प्राप्त केला.

# तळोद्यात भिंत कोसळून दोघे गंभीर जखमी

प्रतिनिधी । तळोदा



शहरातील मराठा चौक परिसरात मध्यरात्री अडीच वाजेच्या सुमारास घराची भिंत कोसळून दोघे गंभीर जखमी झाल्याची घटना घडली आहे. यात एकाची प्रकृती चिंताजनक असून दोघांवर सुरत येथील एका खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, मराठा चौक येथील गाढे कुटुंबातील सदस्य घराच्या गाळ्यात झोपलेले असताना अचानक भिंत कोसळली. यामध्ये रमेश फकीरा गाढे आणि त्यांची सून विद्या नरेश गाढे हे भिंतीखाली दबले गेले. दोघांनाही जबर मार लागला असून रमेश फकीरा गाढे यांना गंभीर दुखापत झाल्याने त्यांची प्रकृती चिंताजनक आहे. दोघांनाही तातडीने सुरत येथे हलविण्यात आले आहे. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच अनुप उदासी, भैय्या चौधरी, योगेश चौधरी, अकबर पिंजारी, योगेश मराठे, गोलू दातार तसेच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेऊन तात्काळ मदतकार्य केले. वेळेवर मदत मिळाल्याने जखमींचा जीव वाचू शकला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# अधिकाऱ्याची चौकशी करुन तत्काळ नुकसान भरपाई द्या!

प्रतिनिधी । कोलवीमाळ

● युवा क्रांती संघटना, तेलखेडी शेतकऱ्यांची मागणी; तहसीलदारांना निवेदन



**नोव्हेंबर २०२५ च्या अवकाळी पावसामुळे तेलखेडी गावातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. सरसकट पंचनामे केलेले असताना देखील बाधित क्षेत्र यादीत तेलखेडी गावाचा समावेश न करणाऱ्या अधिकाऱ्याची चौकशी करून तातडीने अवकाळी नुकसान भरपाई मंजूर करावी, अशी मागणी युवा क्रांती संघटना व तेलखेडी येथील बाधित शेतकऱ्यांकडून करण्यात आली आहे. या मागणीचे निवेदन अक्राणी तहसीलदारांना निवेदन देण्यात आले.**

निवेदनात, मागील वर्षी नोव्हेंबर महिन्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे तेलखेडी गावातील शेतकऱ्यांच्या उभ्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. त्या पार्श्वभूमीवर संपूर्ण तालुक्यातील व परिसरातील अनेक गावांमध्ये शासनामार्फत सरसकट पंचनामे करण्यात आलेले असून त्या गावांचा बाधित क्षेत्र म्हणून समावेश करून शेतकऱ्यांना अवकाळी नुकसान भरपाई मंजूर करण्यात आलेली आहे. मात्र, अत्यंत गंभीर, अन्यायकारक व संशयास्पद बाब अशी आहे की, तेलखेडी गावामध्ये प्रत्यक्षात सरसकट पंचनामे झालेले असताना तसेच शासनाने निश्चित केलेल्या त्रिस्तरीय समितीतील कृषी सहाय्यक, तलाठी व ग्रामसेवक यांच्या सह्या असलेले अवकाळी पीक पंचनामे विधिवत तयार करून संबंधित कार्यालयात जमा करून देखील, तेलखेडी गावाचा बाधित क्षेत्र यादीत समावेश करण्यात आलेला नसल्याचे नमुद करण्यात आले आहे. या प्रकरणात कृषी सहाय्यक विजय बोलकारे यांची भूमिका अत्यंत संशयास्पद असून पंचनामा व पुढील कार्यवाही संदर्भात त्यांनी अप्रत्यक्षपणे पैशाची मागणी केल्याचा संशय शेतकऱ्यांमध्ये निर्माण झाला असल्याचेही निवेदनात नमुद करण्यात आले आहे.

मागणीस नकार दिल्यानंतर तेलखेडी गावाचा बाधित क्षेत्र यादीतून जाणीवपूर्वक वगळण्यात आल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे. हा प्रकार शासकीय पदाचा गैरवापर, भ्रष्टाचार, तसेच शासकीय कर्तव्यात गंभीर कसूर या स्वरूपाचा असून, याची सखोल, निष्पक्ष व स्वतंत्र चौकशी होणे अत्यावश्यक आहे, अशी मागणीही शेतकऱ्यांकडून करण्यात आली आहे.

निवेदन देतेवेळी, युवा क्रांतीचे धडगाव तालुका प्रमुख लक्ष्मण पाडवी, संपर्क प्रमुख बावा पावरा यांच्यासह बाधित शेतकरी माका पावरा, रुमा पाडवी, गोवा पाडवी, मेरसिंग पावरा, ठुमला पावरा, किसन वळवी, सामल्या पावरा, विशाल पावरा, केल्या पावरा, शिमला पावरा, मगन पाडवी, रामदास पाडवी, विरसिंग वळवी, किसन पावरा आदी शेतकरी उपस्थित होते.

### आमच्या गावाशी दुजाभाव...

तेलखेडी येथील शेतकऱ्यांना शासनाच्या अवकाळी नुकसान भरपाईपासून जाणीवपूर्वक वंचित ठेवण्यात आलेले असून, हा प्रकार केवळ प्रशासकीय चूक नसून हेतुपुरस्सर दुर्लक्ष व अन्याय असल्याची शंका युवा क्रांती संघटनेसह संपूर्ण शेतकरी समाजामध्ये निर्माण झालेली आहे. ज्या निकषांवर इतर गावांतील शेतकऱ्यांना एकरी नुकसान भरपाई मंजूर करण्यात आलेली आहे तेच सर्व निकष तेलखेडी गावास पूर्णपणे लागू होत असताना सुद्धा आमच्या गावाशी दुजाभाव का केला जात आहे, असा प्रश्न देखील निवेदनातून उपस्थित करण्यात आला आहे.

# भव्य रॅलीने अशोक लाडवंजारी यांच्या प्रचारास सुरुवात

## माजी मंत्री एकनाथराव खडसे यांची प्रमुख उपस्थिती; प्रभाग १४ मधील उमेदवारांवर फुलांचा वर्षाव





प्रतिनिधी । जळगाव

जळगाव महापालिकेची रणधुमाळी सध्या सुरू आहे. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उमेदवारांच्या प्रचाराला वेग आला आहे. अशात मंगळवार, दि.६ जानेवारी रोजी प्रभाग क्रमांक १४ अ मधील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अधिकृत उमेदवार अशोक सीताराम लाडवंजारी, प्रभाग क्रमांक १४ ब मधील उमेदवार तडवी नाजमीन मकबूल, प्रभाग क्रमांक १४ क मधील उमेदवार सना शेख रियाज, प्रभाग क्रमांक १४ ड मधील उमेदवार जमीलोद्दीन शेख शारीफुद्दीन शेख यांच्या प्रचारास भव्य रॅलीने शुभारंभ झाला. फटाक्यांची आतिषबाजी करीत तांबापूर परिसरातून भव्य रॅली काढण्यात आली.

या प्रचार रॅलीस राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा माजी मंत्री एकनाथराव खडसे यांची प्रमुख उपस्थिती होती. आ.खडसे यांच्या प्रमुख उपस्थितीत इच्छादेवी मंदिरात श्रीफळ वाढवून प्रचाराचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे महानगराध्यक्ष एजाज मलिक, समस्त लाड वंजारी समाज श्रीराम मंदिर मेहरूणचे अध्यक्ष चंद्रकांत लाडवंजारी, खाटीक समाजाचे महाराष्ट्र झोनल अध्यक्ष रईस खाटीक, अकिल खान, मुस्तफा मिर्झा, डॉ. अभिषेक ठाकूर, फिरोज खान, नईम खाटीक यांच्यासह तांबापूर परिसरातील मान्यवरांची उपस्थिती होती.

**या मार्गावरून निघाली भव्य प्रचार रॅली**

इच्छा देवी मंदिरात पूजा करून उमेदवार अशोक लाडवंजारी यांच्यासह प्रभाग क्रमांक १४ मधील सर्व उमेदवारांच्या प्रचार रॅली सुरुवात झाली. सदर रॅली इच्छादेवी मंदिरमार्गे फुकटपुरा चौक, शहीद अब्दुल हमीद चौक, टिपू सुलतान चौक, बिलाल चौक, महादेव मंदिर चौक, जुमा शहा वखार, मच्छी बाजार चौक, शिरसोली नाका तांबापुर परिसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळामार्गे शहीद अब्दुल हमीद चौक येथे प्रचार रॅलीचा समारोप करण्यात आला. या प्रचारादरम्यान नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद या प्रचार रॅलीत दिसून आला. अशोकभाऊ तुम आगे बढो, हम तुम्हारे साथ है, कोण म्हणतो येणार नाही, आल्याशिवाय राहणार नाही, कोण आया... शेर आया अशा विविध गगनभेदी घोषणांनी परिसर दणाणून गेला होता.यावेळी प्रभागातील नागरिकांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरद चंद्र पवार पक्षाच्या उमेदवारांचे फुलांच्या पाकळ्या उधळून स्वागत केले प्रचारादरम्यान ठिकठिकाणी नागरिकांनी अशोकभाऊ लाडवंजारी यांना हार घालून सत्कार देखील केला. त्यांनी प्रेमाचे आभार मानत सर्वांचे अभिवादन केले.



> जळगाव महापालिका निवडणुकीसाठी चारही उमेदवार एक दलाने काम करीत आहेत. या प्रभागात गेल्या दहा वर्षात विकास खुंटलेला आहे. या प्रभागात विविध समस्या असून त्या मागील निवडणुकीत निवडून आलेल्या उमेदवारांना सोडविता आल्या नसल्याने जनते मध्ये रोष आहे. या प्रभागाचे नेतृत्व केलेल्या उमेदवारावर मनपाची भंगार पाईपलाईन चोरीचा गुन्हा देखील दाखल आहे. त्यावेळी भाजपने बंटी-बबली चोर है अशा घोषणा दिल्या होत्या. अशाच उमेदवाराला भाजपने उमेदवारी दिलेली आहे. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या उमेदवारांना त्याचा फायदा होईल व जनता निवडून देईल, असा आशावाद अशोक लाडवंजारी यांनी व्यक्त केला. या प्रभागांमधून निवडून आलेले उमेदवाराकडे महापौर तसेच विरोधी पक्ष नेतेपद भूषवलेली आहे. मात्र त्यांनी या प्रभागाचा विकास साधलेला नाही. आता आम्ही याच गोष्टीचा फायदा घेऊन मतदारांचे आशीर्वाद घेत आहोत. जनता आम्हाला साथ देतील,असा विश्वासही प्रभाग १४ मधील उमेदवार अशोक लाडवंजारी यांनी व्यक्त केला.



> जळगाव महापालिकेचा रणसंग्राम सुरू आहे. वर्षानुवर्ष निवडणुका होत आहेत. मात्र प्रत्येक निवडणुकीत उमेदवारांकडून आश्वासने दिली जात आहे. जळगाव शहराचे सिंगापूर करू. मात्र सिंगापूर करण्याऐवजी धारावी झालेला आहे. पिण्याची पाण्याचा प्रश्न, आरोग्याचे समस्या अशा विविध समस्यांनी जळगाव शहराला हेरले आहे. मागील मनपा निवडणुकीत सिंगापूर करण्याची घोषणा केली होती. मात्र सिंगापूर ऐवजी धारावी झालेली आहे. सत्ताधाऱ्यांकडे या निवडणुकीत ७५ उमेदवार नव्हते. त्यामुळे त्यांनी सत्तेत असणारे उमेदवार आयात केले. त्यांनाच तिकीट देऊन या निवडणुकीत उभे केले. त्यामुळे त्यांच्याकडून फारशी अपेक्षा नाही. राष्ट्रवादी काँग्रेसने नवीन उमेदवारांना संधी दिली असून शहराचा विकास व्हावा, यासाठी तुतारीचे बटन दाबून त्यांना विजयी करावे, असे आवाहन आ. एकनाथराव खडसे यांनी यावेळी केले.



> महापालिका निवडणुकीत प्रभाग १४ मधील उमेदवारांच्या प्रचार शुभारंभ एकदम जबरदस्त रॅली काढून करण्यात आला आहे. हा शुभारंभ नव्हता तर विजयी रॅली वाटत होती. विशेष करून माजीमंत्री आ.एकनाथराव खडसे या रॅलीत सहभागी झाले होते. या गर्दीवरून असे दिसून येते की मतदारांमध्ये मोठा उत्साह होता. लोकांच्या चेहऱ्यावर हसू दिसून आले आणि उत्साह संचारलेला होता. या प्रभागातील नागरिकांना आवान करेन की, तुतारीचे बटन दाबून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या उमेदवारांना निवडून द्या, असे आवाहन एजाज मलिक यांनी केले. राष्ट्रवादीने वचननामा पूर्ण करण्याचे आश्वासन देत तांबापूर झोपडपट्टी ही धारावीच्या धर्तीवर तंबापूर परिसराचा विकास करू, अशी ग्वाही देखील राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे महानगराध्यक्ष एजाज मलिक यांनी या प्रचार रॅलीप्रसंगी दिली. त्यांनी देखील प्रचार रॅलीत नागरिकांना अभिवादन केले.

## थोडक्यात

### स्मशानभूमी परिसरात श्रमदानातून साफसफाई

**भुसावळ ।** तालुक्यातील शिंदी येथे गावाजवळून जळगाव-बोदवड रस्ता रुंदीकरणाचे काम सुरू झाले आहे. रस्त्याच्या कामात काळी माती निघत आहे. नेमकी हीच बाब सामाजिक कार्यकर्ते किरण जाधव यांनी लक्षात घेऊन त्या ठिकाणची काही माती मुरमाळ- खडकाळ असलेल्या स्मशानभूमी परिसरात टाकून घेतली. माती पसरविण्याअगोदर तरुण मित्रमंडळीच्या माध्यमातून वाढलेले गवत जाळून परिसर साफ व स्वच्छ केला. संपूर्ण स्मशानभूमी परिसरात मातीचा थर पसरविल्यानंतर वृक्षारोपण करण्यासाठी ही काळी माती वरदान ठरेल. उजाड व दुर्लक्षित झालेल्या परिसरात केवळ समय सूचकता दाखवून केलेल्या सुरुवातीमुळे असंख्य हात भविष्यात पुढे येतील, असे किरण जाधव यांनी सांगितले. यावेळी चेतन कोळी, भूषण राजपूत उपस्थित होते.

### आरोग्यासाठी धावा-रन भुसावळ; रोटरी रेलसिटीचा उपक्रम

**भुसावळ ।** येथील रोटरी क्लब ऑफ भुसावळ रेल सिटीतर्फे रविवार दि.११ जानेवारी रोजी आरोग्यासाठी धावा रन भुसावळ हा प्रोजेक्ट आयोजित करण्यात आलेला आहे. भुसावळकरांमध्ये व्यायामाची आवड निर्माण व्हावी व रनिंग, चालणे याची आवड निर्माण व्हावी म्हणून रेल सिटीने हा उपक्रम आयोजित केला आहे. यामध्ये दहा किलोमीटर फिटनेस रन, पाच किलोमिटर अवेअरनेस रन आणि तीन किलोमीटर फन रन असे स्वरूप आहे. रनची सुरुवात सकाळी ६ वाजता होईल. यामध्ये भाग घेणाऱ्यांना टी-शर्ट, बॅग नाश्ता आणि लकी ड्रॉ तर्फे वेगवेगळ्या गृहपयोगी वस्तू दिल्या जाणार आहे.

## शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षपदी वीरेंद्र पाटील यांची निवड

प्रतिनिधी । पाचोरा

आसनखेडा जि. प. प्राथमिक शाळेत नुकतीच शालेय व्यवस्थापन समिती गठित करण्यात आली.

अध्यक्षपदी वीरेंद्र रामकृष्ण पाटील यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. तर कार्यकारणी सदस्यांमध्ये सुदर्शन पाटील, बाळु बोरसे, गणेश हटकर, ईश्वर पाटील, शशिकांत बोरसे, गीता भिल, देवकाबाई भिल, उषा बागुल, व्ही एस पाटील, वैशाली पाटील, शितल सोनवणे (शिक्षिका), मुख्याध्यापक सुनंदा पाटील, दिलीप पाटील, धिरज पाटील, सुनील पाटील नवनिर्वाचीत अध्यक्षाचे शाळेच्या वतीने दिलीप पाटील यांनी सत्कार केला. आभार प्रदर्शन मुख्याध्यापिका सुनंदा पाटील यांनी केले.

## यावल महाविद्यालयाच्या रासेयो शिबिरात हवामान बदल अन् युवकांची भूमिका विषयावर व्याख्यान

प्रतिनिधी । यावल

**कवयित्री बहिणाबाई चौधरी, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठांतर्गत, जळगाव जिल्हा मराठा विद्या प्रसारकसह समाज संस्थेच्या येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. संध्या सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजना एककाचे विशेष श्रमसंस्कार शिबिर दि.२ जानेवारी ते ०८ जानेवारी २०२६ या कालावधीत दत्तक गाव सांगवी येथे आयोजित करण्यात आले आहे.**

शिबिराच्या पहिल्या दिवशी उद्घाटन कार्यक्रम संपन्न झाल्यानंतर शिबिराच्या दुसऱ्या सत्रात हवामान बदल आणि युवकांची भूमिका या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले.

प्रमुख वक्ते महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. एम.डी. खैरनार यांनी तरुण पिढी ही हवामान बदलाच्या परिणामांना सर्वाधिक सामोरे जाणारी आहे आणि त्यांच्यात प्रचंड ऊर्जा व नाविन्यपूर्ण क्षमता आहे. त्यामुळे, त्यांना योग्य व्यासपीठ आणि समर्थन मिळाल्यास, ते हवामान बदलाचा सामना करण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान देऊ शकतात.

तर रोसेयो मधील स्वयंसेवकांनीही हवामान बदलात समाजामध्ये जागृत निर्माण करण्यासाठी तत्पर व्हावे असे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षा स्वयंसेविका कृष्णा विनोद पाटील हया होत्या. त्यांनी आपल्या मनोगतात विद्यार्थी आपल्या जीवन काळात बदलत्या हवामानाला तोंड देण्यासाठी समाजामध्ये जागृती निर्माण करणे आवश्यक आहे असे सांगितले.

या प्रसंगी रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.पी.व्ही. पावरा, सहायक कार्यक्रम अधिकारी प्रा.सी.टी.वसावे, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. आर. एस. शिरसाठ, प्रा. पी. व्ही. रावते श्री. प्रमोद जोहरे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भार्गवी पराग बावस्कर हिने केले, तर पाहण्यांचा परिचय दुर्गा चंद्रकांत पाटील हिने करून दिला. व आभार डिंपल मुकेश भालेराव हिने मांडले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी मोलाचे सहकार्य केले.

## कोरोना काळात बंद झालेल्या रेल्वे गाड्यांचे थांबे पुन्हा पूर्ववत

प्रतिनिधी । भुसावळ

कोरोना काळात बंद झालेल्या सर्व रेल्वे गाड्यांना वरणगाव येथे पुन्हा थांबे सुरू होणार असल्याची माहिती केंद्रीय मंत्री रक्षा खडसे यांनी दिली आहे.

वरणगाव परिसरासाठी मोठा दिलासा मानला जात आहे. वरणगाव येथील भाजपच्या नवनियुक्त नगरसेवक व पदाधिकाऱ्यांनी केंद्रीय क्रीडा व युवक कल्याण मंत्री श्रीमती रक्षा खडसे यांची सदिच्छा भेट घेतली. या भेटीदरम्यान वरणगाव शहरातील विविध विकासकामांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. विशेषतः कोरोना काळात बंद करण्यात आलेल्या रेल्वे गाड्यांच्या थांब्यांमुळे नागरिक, विद्यार्थी, नोकरदार व व्यापाऱ्यांना होत असलेल्या अडचणींचा मुद्दा नगरसेवकांनी ठामपणे मांडला. नगरसेवक व पदाधिकाऱ्यांच्या मागणीची तातडीने दखल घेत रक्षाताईंनी थेट रेल्वे मंत्र्यांशी चर्चा केली. या चर्चेनंतर तीन जलद (एक्सप्रेस) रेल्वे गाड्यांचे थांबे वरणगाव येथे पुन्हा सुरू करण्यास मंजुरी मिळाल्याची माहिती रक्षाताईंनी दिली.

# राज्यस्तरीय नाट्यगीत गायन स्पर्धेत अकोल्याचा हिमांशू देशमुख प्रथम

प्रतिनिधी । चोपडा

**येथील श्री संत गजानन बहुद्देशीय संस्थेने आपला २१ वा वर्धापन दिवस साजरा करत असताना ६ व्या राज्यस्तरीय खुल्या नाट्यगीत गायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत पहिला क्रमांक अकोला येथील हिमांशू देशमुख या गायक कलाकाराने पटकावला. विजेत्याला रोख रुपये ११ हजार, सन्मानचिन्ह मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.**





तत्पूर्वी येथील नगर परिषद नाट्यगृहात झालेल्या या राज्यस्तरीय स्पर्धेच्या उद्घाटन सोहळ्याचे अध्यक्ष माजी विधानसभा अध्यक्ष प्रा. अरुणभाई गुजराथी हे होते. तर उद्घाटक म्हणून केंद्रीय क्रीडा व युवक कल्याण राज्यमंत्री ना. रक्षा खडसे या उपस्थित होत्या. डॉ. विकास हरताळकर, पणन महासंघाचे उपाध्यक्ष रोहित निकम, माजी नगरसेवक राजाराम पाटील, अभियंता दीपक सोनवणे, संस्थेचे अध्यक्ष मनोज चित्रकथी, स्पर्धेचे परीक्षक पं. मुकुंद मराठे (ठाणे), पं. विश्वनाथ दाशरथे (छ. संभाजी नगर) यांची मंचावर प्रमुख उपस्थिती होती. संस्थेच्यावतीने दिला जाणारा संगीत क्षेत्रातील जीवनगौरव पुरस्कार मोरेश्वर भावे (थाळनेर), साहित्य क्षेत्रातील जीवनगौरव चोपडा नगर वाचन मंदिराचे ग्रंथपाल गोपाळ दांडेकर यांना यावेळी मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. स्पर्धेला साथ संगीत करणाऱ्या नरेंद्र भावे (चोपडा) व गोविंद मोकाशी (पाचोरा) यांचाही सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलतांना ना. रक्षा खडसे म्हणाल्या, जगात आपली संस्कृती हीच आपली ताकद व आपली ओळख आहे. येणारी पिढी या संस्कृतीशी सुपरिचित असावी, हे पंतप्रधानाचे लक्ष्य आहे. भारतीय सांस्कृतिक व सांगीतिक परंपरा जिवंत ठेवण्याचे कार्य चोपड्यात श्री संत गजानन बहुद्देशीय संस्थेच्या माध्यमातून सुरु आहे, याचा आनंद आहे. भविष्यात या स्पर्धेसाठी आवश्यक ती मदत केली जाईल, असे सांगत त्यांनी आश्वस्त केले.

अध्यक्षस्थानावरुन बोलतांना प्रा.अरुणभाई गुजराथी यांनी चोपड्याची सांस्कृतिक ओळख या स्पर्धेच्या माध्यमातून निर्माण होईल असा विश्वास व्यक्त केला. यावेळी ते म्हणाले, संगीत नसेल तर माणूस जगू शकत नाही. आपल्या जीवनात आजन्म संगीताची साथ असते. रागदारीतील स्वर नेहमी कोमल राहण्याचे शिकवतात.

उद्घाटन सोहळ्याचा आरंभ नांदी व दीपप्रज्वलाने करण्यात आला. सोहळ्याचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन योगेश चौधरी यांनी तर प्रास्ताविक संस्थेचे अध्यक्ष मनोज चित्रकथी यांनी यांनी केले. स्पर्धेचे बक्षीस वितरण तहसीलदार भाऊसाहेब थोरात, माजी नगरसेवक डॉ रवींद्र पाटील, वैद्यकीय अधिकारी डॉ सिद्धार्थ साळुंखे यांच्या हस्ते करण्यात आले. स्पर्धेचे परीक्षक पं. मुकुंद मराठे व पं. विश्वनाथ दाशरथे यांनी यावेळी गायन प्रस्तुती केली. स्पर्धेच्या यशस्वितेसाठी विजय पालीवाल, भागवत जाधव, जगदीश पाठक, सतीश पाटील, विवेक बाविस्कर, दुर्गेश चौधरी, निलेश कुंभार, प्रेम वाघ यांच्यासह अनेकांनी परिश्रम घेतले.

**स्पर्धेचा निकाल** - द्वितीय वेद मुळे (बीड), सिद्धी कुलकर्णी (पाचोरा - जळगाव), उत्तेजनार्थ - अथर्व रत्नाकर (सांगली), गौतमी मयककर (मुंबई), अक्षज महाजन (डोंबिवली).

### शिवरंजनी संगीत महोत्सवाची मुहूर्तमेढ

श्री संत गजानन बहुउद्देशीय संस्थेच्या शिवरंजनी संगीत विद्यालयाच्यावतीने आयोजित पहिल्या शिवरंजनी संगीत महोत्सवानिमित्त चोपड्यातील संगीत महोत्सवाची मुहूर्तमेढ रोवण्यात आली. या संगीत महोत्सवाची सुरुवात धृपद गायकीने करण्यात आली. या संगीत महोत्सवाचे स्वागत स्वागताध्यक्ष डॉ. विकास हरताळकर तर उद्घाटक पं. विश्वनाथ दाशरथे हे होते. प्रा. अरुणभाई गुजराथी यांची विशेष उपस्थिती होती. या संगीत महोत्सवाच्या पहिल्या सत्रात आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या धृपद गायिका मेघना सरदार (पुणे) यांनी भारतीय संगीतातील आद्य राग धृपदमधील पटदीप रागातील बंदिश व भूप रागातील पद्य सादर करत उपस्थित श्रोत्यांची उत्स्फूर्त दाद मिळवली. तर दुसऱ्या सत्रात किराणा घराण्यातील सुप्रसिद्ध गायक विनायक हेगडे (कर्नाटक) यांनी केदार रागातील कान्हा रे नंदनंदना..., तीर्थ विठ्ठल.., माझे माहेर पंढरी..., नारायणा रमा रमणा... या बंदिशी सादर करत श्रोत्यांना वेगळी अनुभूती दिली. गायक कलावंतांना पखवाजावर रामेश्वर घायाळ (पुणे), संवादिनी वरद सोहनी (मुंबई), तबला नरेंद्र भावे (चोपडा) यांच्यासह क्लेयर (फ्रान्स), योगेश चौधरी, विवेक बाविस्कर यांनी साथसंगत केली. महोत्सवाचे निमंत्रक मनोज चित्रकथी होते. निवेदन योगेश चौधरी यांनी तर प्रास्ताविक विजय पालीवाल यांनी केले.